**महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड**

**(पुणे मेट्रो रेल प्रकल्प)**

**“लास्ट माईल कनेक्टिविटी करीता तरुणानाचा Hackathon”**

**“नागपूरच्या UMI कॉन्फरेंस दरम्यान अभिनव  उपक्रम”**

**पुणे ०३ : ‘’व्हेअर इज माय ट्रान्स्पोर्ट’’ असा प्रश्न उपस्थित करून आजची तरुणाई स्वतःच या प्रश्नांची उत्तरे महा मेट्रोच्या साथीने शोधायला निघाली आहेत. ‘The Transform Nagpur Hackathon’ या अभिनव पद्धतीच्या उपक्रमात सामील व्हायला तरुणाईचा दांडगा उत्साह यावेळी अनुभवयास मिळाला. फस्ट माईल ते लास्ट माईल कनेक्टिविटी ही जर आपली गरज असेल तर उपलब्ध साधनांचा उपयोग करूनच यावर काय उपाययोजना करता येऊ शकतात आणि सार्वजनिक वाहतूक अधिक सोयीची व सुविधाजनक करता येईल यावर युवा वर्ग उत्स्फूर्त सहभाग घेऊन हिरीरीने चर्चा करतांना दिसले.**

**निमित्त होते केंद्रीय गृहनिर्माण व नगरविकास मंत्रालय, महाराष्ट्र सरकार आणि महा मेट्रो तर्फे संयुक्त पणे आयोजित  ११ व्या अर्बन मोबिलिटी इंडिया कोन्फेरेंसचे, कॉन्फेरेंसच्या दुसऱ्या दिवशी अनेकविध कार्यक्रमांच्या भाऊगर्दीत उठून दिसणाऱ्या hackathon या स्पर्धेत तरुणांना जोडून घेण्याचा उद्देश म्हणजे हा वर्ग मेट्रोशी भावनिक रित्या आपोआप जुळला गेला आहे तसेच आजच्या तरुणाईच्या**

बौद्धिक तात्त्विक वैचारिक गुणांना, त्यांच्यातील कल्पनांना वाव देण्यासाठी ‘hackothon’ नावाची स्पर्धा आज दिवसभर राबवण्यात आली. विविध क्षेत्रातले विविध महाविद्यालयीन तरुणांच्या अनेक गटाने एकत्र बसून त्यांच्या मनातील मेट्रो कनेक्टिविटी संकल्पनेवर चर्चा घडवून आणली यातून अनेक संकल्पना आकारास आल्या त्या एकत्र मांडून या संकल्पना सबमिट केल्या जातील आणि एक्स्पोच्या शेवटच्या दिवशी त्यावर निकाल घोषित केला जाईल. स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. हा उपक्रम GIZ आणि Where Is My Transport ? या दोन संस्थांनी आयोजित केला असून Transformative Urban Mobility Initiative (TUMI) and Working Group Transport & Environment (TUEWAS) यांनी प्रायोजित केला आहे.

लास्ट माईल कनेक्टिविटी या विषयांवर मेट्रो तर्फे सातत्याने उपक्रम राबवल्या जात असल्याने या उपक्रमाला महत्व प्राप्त झाले आहे.तरुणांना घेऊन The Transform Nagpur Hackathon घडवून आणण्याची संकल्पना साकार करणारे साशा बेन्जामिन हे कंटेंट मार्केटिंगसाठी काम करतात. शहरातील मुख्य महत्वाकांक्षी प्रकल्पाशी आजच्या टेक्नोसावी तरुणांना जोडून त्यांच्या कल्पनेतील मेट्रो साकार करण्याच्या प्रयत्नात त्यांनाही हातभार लावता येतो तसेच त्यांच्या इन्होव्हेटीव आईडिया मेट्रो प्रकल्पात फायद्याच्या ठरू शकतात असा दुहेरी हेतू यातून साकार करता येतो असे ते म्हणतात. या उपक्रमाच्या यशासाठी त्यांनी स्वतः शहरभर विविध साधनांनी प्रवास करून स्थानंकातील अंतर त्यासाठी लागणारे भाडे, द्यावा लागणारा वेळ अश्या अनेक बाबींचा अभ्यास केला आणि ही संपूर्ण माहिती एकत्र करून सहभागी स्पर्धकांना देण्यात आली. या माहितीच्या आधारे त्यांना त्यांच्या संकल्पना मांडायच्या होत्या. या स्पर्धेत जवळ जवळ ५० हून जास्त तरुणांनी सहभाग नोंदवला दहा एक गटात वेगवेगळे बसून चर्चा करतांना ही मुले दिसत होती. यांनी नोंदवलेल्या संकल्पना किती वेगळ्या आणि इन्होव्हेटीव आहे यावर यांचा निकाल निश्चित करण्यात येणार आहे.

या कॉन्फ्रेंसच्या निमित्याने चिटणवीस सेंटर येथे पुणे आणि नागपूर मेट्रो प्रकल्पाचे वैशिष्ठ्य दाखवनारे स्टॉल तयार करण्यात आले होते.ग्रीन पुणे या थीम वर पुणे मेट्रो चा स्टॉल तर प्रॉपर्टी डेव्हलपमेंट या विषयावर नागपूर मेट्रोच्या स्टॉलचे निर्माण करण्यात आले होते. पुण्याचा मेट्रो प्रकल्प हां कश्या प्रकारे पर्यावरणपूरक असेल याच्या विविध छटा स्टॉल च्या माध्यमाने दर्शविण्यात आल्या होत्या. महत्वाच म्हणजे पुणे मेट्रो प्रकल्पाच्या स्टॉलस वर असलेले पुणेरी पगडी हे सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. या दोन्ही स्टॉल चे उद्घाटन मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस

यांनी केले.यावेळी केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी,केंद्रीय मंत्री श्री.हरदीप सिंह पुरी,राज्याचे उर्जा मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित,पुणे महानगरपालिकेच्या महापौर श्रीमती. मुक्त टिळक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर श्री.राहुल जाधव उपस्थित होते.